दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ३ रे अंक २०५ वा गुरूवार दि.११ जानेवारी २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# शिंदेंचा व्हीप ठाकरे गटाला लागू होणार




मुंबई (प्रतिनिधी) : सर्वोच्च न्यायलयाने दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करूनच आपण आमदार अपात्रतेबाबतच्या याचिकेवर निर्णय दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने अपात्रतेबाबत निर्णय घेताना सर्वप्रथम मूळ राजकीय पक्ष कोणाचा हे ठरवण्यास सांगून त्यासाठी कोणते निकष गृहीत धरले जावेत, ते सांगितले होते. आपल्यावर आरोप करण्यापूर्वी निकालपत्र वाचावे, समजत नसेल तर तज्ज्ञांकडून समजावून घ्या, असा सल्ला देताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी, शिंदे गटाच्या भरत गोगावले यांचा व्हीप ठाकरे गटातील आमदारांनाही लागू राहील, असे स्पष्ट केले.विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बुधवारी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल दिला. शिंदे गट म्हणजेच खरी शिवसेना असल्याचा निर्वाळा त्यांनी दिल्यानंतर राजकीय वर्तुळात आरोप - प्रत्यारोपांचा धुरळा उडाला आहे. या पार्श्वभूमीवर एका वृत्तवाहनीला दिलेल्या मुलाखतीत राहुल नार्वेकर यांनी सर्व बाबींची स्पष्टता केली आहे. सुप्रीम कोर्टाच्या गाईडलाईन्सचं तंतोतंत पालन करूनच आपण आमदार अपात्रतेचा निर्णय दिला आहे. कमी वेळेत अत्यंत किचकट विषय सोडवण्याची जबाबदारी माझ्यावर होती. त्यासाठी दिवसाला १५ ते १६ तास काम करीत होतो. नागपूर अधिवेशनाच्या दरम्यान अधिवेशन सभागृहात उपस्थित राहून आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी घेतली. सर्वोच्च न्यायालयाने दिलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी मी पूर्ण प्रयत्न केलेला आहे. सर्वोच्च न्यायालयानेच राजकीय पक्ष ठरवण्याचा अधिकार मला दिला होता. मूळ राजकीय पक्ष ठरवल्याशिवाय कोणाचा व्हीप लागू होईल हे ठरवता येत नव्हते. म्हणून मी सर्वप्रथम मूळ राजकीय पक्ष शिंदे की ठाकरे यावर निर्णय दिला. शिवसेनेच्या संविधानाचा विचार केला तर ठाकरे गटांनी दिलेली २०१८ ची शिवसेनेची घटना ग्रा धरायची की शिंदे गटाच्या मागणीप्रमाणे १९९९ च्या घटनेचा आधार घ्यायचा? असा प्रश्न होता. या संदर्भातही सुप्रीम कोर्टाने स्पष्टपणे सांगितलेलं की, दोन पक्ष दोन वेगवेगळे दाखले देत असेल तर निवडणूक आयोगाकडील घटना ग्रा धरावी. त्यानुसार निवडणूक आयोगाच्या अधिकृत रेकॉर्डवर असणारी घटनेची प्रत मागवली. निवडणूक आयोगाने १९९९ सालची घटना आम्हाला दिली व त्यानुसार निर्णय घेण्यात आल्याचे अध्यक्षांनी स्पष्ट केले.गोगावलेंचा व्हीप शिवसेनेच्या सर्व आमदारांना लागू होणार सुप्रीम कोर्टाने सुनील प्रभू यांची नियुक्ती कायमस्वरुपी योग्य ठरवली आणि गोगावलांची नियुक्ती अयोग्य ठरवली, असा गैरसमज पसरवला जातोय. वस्तुस्थिती तशी नाही. सुप्रीम कोर्टानेच मूळ राजकीय पक्ष कुणाचा हे ठरवण्यास सांगितले होते. मूळ राजकीय पक्ष ठरवल्यानंतर भरत गोगावले यांची प्रतोद पदावरील नियुक्ती कायम झाली आहे. आता अध्यक्षांच्या समोर केवळ एकच शिवसेना विधिमंडळ गट अस्तित्वात आहे, असे सांगत गोगावले यांचा व्हीप ठाकरे गटातील आमदारांनाही लागू राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.म्हणून ठाकरे गटाचेही आमदार पात्र ठरले ठाकरे गटातील आमदारांच्या अपात्रतेबाबत शिंदे गटाने दाखल केलेली अपात्रता याचिकाही अध्यक्षांनी फेटाळली आहे. याबाबत विचारता नार्वेकर म्हणाले, गोगावले यांना व्हीप देण्याचा अधिकार होता; परंतु तो योग्यरित्या बजावला गेला नाही. तुमचा व्हीप समोरच्याला मिळालाच नसेल तर त्याच्याकडून त्या अपेक्षित कार्याची तुम्ही अपेक्षा कशी करू शकता? असा प्रश्न असल्याने ही याचिका फेटाळण्यात आल्याचे नार्वेकर यांनी स्पष्ट केले.

## माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांच्या निवृत्तीवेतनासाठी फेब्रुवारीमध्ये पेंशन अदालत

लातूर, दि. १२ (जिमाका) : १४ जानेवारी, २०२४ रोजी भूतपूर्व सैनिक दिवस निमित्त मुख्यालय दक्षिण महाराष्ट्र आणि गोवा कार्यालयामार्फत ९ जानेवारी, २०२४ रोजी पुणे येथे पूर्व सैनिक मेळावा रद्द करुन पुढे ढकलण्यात आला आहे. हा मेळावा फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात घेण्याचे नियोजित केले आहे. या कार्यक्रमात भूतपूर्व सैनिक, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, विधवा पत्नी तथा त्यांच्या अवलंबित यांच्या पेंशन, ईसीएचएस, सीएसडी कॅन्टीन याबाबतच्या असणाऱ्या अडीअडचणीचे निराकरण करण्यात येणार आहे. ज्या सैनिक, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता , विधवा पत्नी तथा त्यांच्या अवलंबित यांच्यावरील प्रकारच्या अडीअडचणी असतील त्यांनी विहित नमुन्यामध्ये माहिती व तीन प्रतीमध्ये १७ जानेवारी, २०२४ पर्यंत लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे जमा करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल (नि.) शरद पांढरे यांनी केले आहे.

## महाराष्ट्रातील जेष्ट आयुर्विमा सल्लागार विद्याताई तेरकर यांचे निधन




लातूर – मराठवाड्यातील सर्वात जुन्या,आयुर्विमा सल्लागार विद्याताई गोपिनाथ तेरकर यांचे वयाच्या ७३ व्या वर्षी दि.११ जानेवारी रोजी लातूर येथील एका खाजगी रुग्णालयात अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती गोपिनाथराव तेरकर २ मुले ४ मुली , नातू,पणतू, नाती, असा मोठा परीवार आहे.सौ. विद्याताई तेरकर यांनी आपल्या आयुर्विमा व्यावसायाची सुरुवात १९७३ साला पासून म्हणजे ६० वर्षापूर्वी केली होती, त्यावेळी विमा विक्री करणे अत्यंत कठीण होते.लातूर जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यात त्या संतत २५ वर्षे विमा व्यावसायात प्रथम क्रमांकावर होत्या. त्यांनी अमेरीकेतील मिलियन डॉलर राउंड टेबलच्या गोलमेज परिषदेत १० वेळेस सहभाग नोंदविला होता. त्यांना भारतीय आयुर्विमा महामंडळाने चेअरमन क्लब मेंबर या पदाचे आजीवन सदस्यत्व दिले होते. लातूरचे आयुर्विमा क्षेत्रात नाव उचावायचे उत्तम कार्य विद्याताई तेरकर यांनी केले. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल आयुर्विमा क्षेत्रातील व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी दुःख व्यक्त केले आहे.

## अटल सेतूच्या उद्घाटन कार्यक्रमावर ठाकरे गटाचा बहिष्कार

मुंबई : मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्प म्हणजेच अटल बिहारी वाजपेयी स्मृती न्हावाशिवा अटल सेतूचे उद्घाटन शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. या उद्घाटन सोहळ्यावर शिवसेना उद्धव बाळसाहेब ठाकरे गटाने बहिष्कार टाकल आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होत असताना शिवसेना ठाकरे गटाच्या स्थानिक आमदार खासदारांना ऐनवेळी निमंत्रण दिल्याने ठाकरे गटाकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. उद्घाटन सोहळ्याच्या कार्यक्रमांना काही जणांना गुरुवारी रात्री तर काही जणांना शुक्रवारी सकाळी निमंत्रण पाठवण्यात आसे आहे. शासनाच्या कार्यक्रमाची जी निमंत्रण पत्रिका असतात त्यावर स्थानिक आमदार आणि खासदारांचे नाव असणे आवश्यक आहे. मात्र निमंत्रणपत्रिकेवर नजर मारल्यास शिवसेने ठाकरे गटाच्या स्थानिक खासदारांचे नाव नाही.शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांचे नाव निमंत्रणपत्रिकेत नाही. राज्यपाल, केंद्रीय मंत्री, मंत्र्याची नावे आहेत. सुनील तटकरे आणि श्रीरंग बारणे या दोन्ही खासदारांची नावे आहेत. मात्र त्या ठिकाणचे स्थानिक खासदार अरविंद सावंताचे नाव नाही.

## माळेगाव हे शक्तिस्थळ आहे आमदार धिरज देशमुख यांची भावना; भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या खंडोबारायाची केली मनोभावे पूजा



लातूर : नांदेड जिल्ह्यातील माळेगाव येथील श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान हे राज्यातीलच नव्हे तर देशातील असंख्य भाविकांचे श्रध्दास्थान आहे. कारण हे एक शक्तिस्थळ आहे. इथे आल्यानंतर नवी ऊर्जा, नवी शक्ती आपल्या सर्वांना मिळते. इथे भरणाऱ्या यात्रेशी आमचे जिव्हाळ्याचे नाते आहे, अशी भावना 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी व्यक्त केली. दरवर्षी प्रमाणेच यंदाही माळेगाव येथे जावून आमदार श्री. धिरज देशमुख यांनी खंडोबारायाची मनोभावे पूजा केली. काळ्या मातीत राबणाऱ्या शेतकरी बांधवांसमोरील दुष्काळ हटू दे, त्यांना सुख-समृद्धी लाभू दे, असे साकडे घातले. त्यानंतर दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेल्या श्री खंडोबा यात्रेत सहभागी होवून आमदार श्री. धिरज देशमुख यांनी यात्रेकरूंशी, विविध भागांतून आलेल्या भविकांशी, व्यापाऱ्यांशी संवाद साधला. तसेच, यात्रा परिसरातील सुविधांची पाहणी केली. विविध दालनांना भेटही दिली. आमदार श्री. धिरज देशमुख म्हणाले, वेळ अमावस्याची पूजा झाल्यानंतर दरवर्षी मी माळेगाव येथे येतो. ही देशमुख कुटुंबीयांची परंपराच आहे. याआधी आमचे दादा आदरणीय दगडोजीराव देशमुख, माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख हे नित्यनियमाने इथे येत असत. ती परंपरा देशमुख कुटुंबियांच्या वतीने आजही तशीच पुढे सुरू आहे. इथल्या यात्रेला अजून मोठे स्वरूप कसे प्राप्त होईल, त्यासाठी इथे आणखी पायाभूत सुविधा कशा वाढवता येतील, यावर आमचा येणाऱ्या काळात भर असेल, असेही ते यावेळी म्हणाले. याप्रसंगी समीर राठी, जितेंद्रसिंग पहाडिया, दिमेश बक्रानिया, विमल बक्रानिया, रोहित पाटील, चिराग मिस्त्री, अजय माळी आदी मान्यवर, ग्रामस्थ व देवस्थान पदाधिकारी उपस्थित होते.

## राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती लातूर जिल्हा वकील मंडळाच्या वतीने उत्साहात साजरी



लातूर :- लातूर जिल्हा वकील मंडळाच्या सभागृहात राष्ट्रमाता जिजाऊ स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे दिपाने , धुपाने पूजन करून पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी लातूर जिल्हा वकील मंडळाचे सचिव अँड प्रदिपसिंह गंगणे, महिला उपाध्यक्ष अँड हर्षला जोशी, ग्रंथालय सचिव अँड संतोष सोनी, कोषाध्यक्ष अँड अमोल पोतदार, अँड शिरीष दहिवाल ,अँड मनोज जाधव, अँड , अँड किरण चिंते, अँड मेघा पाटणकर, अँड नयना देवताळकार , अँड वैशाली निळेकर, अँड मनिषा दिवे पाटील, अँड शिवाजी गायकवाड,अँड चोपडे, अँड सुनिल चुंनगुने, अँड बालाजी चापोलिकर, अँड राम गुरव, अँड साळुंखे, अँड परमेश्वर सुर्यवंशी, अँड लहू चामे, अँड अजय कलशेट्टी, अँड अमर कदम, अँड जाधव,अँड राहुल स्वामी,अँड सुशिल उपासे आदी विधिज्ञ मोठया संख्येने उपस्थित होते

## अनूसूचित जाती व अनूसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनी ठिबक आणि तुषार सिंचन योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन

लातूर, दि. १२ (जिमाका) : अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विकास व्हावा, यासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजना प्रति थेंब अधिक पिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत महाडिबीटी पोर्टलवर ठिबक व तुषार सिंचन योजनेचा लाभ देण्यात येत आहे. यासाठी जिल्हयातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकरी बांधवांनी महाडीबीटी पोर्टलवर जास्तीत जास्त अर्ज करुन लाभ घेण्याचे आवाहन लातूर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी एस. व्ही. लाडके यांनी केले आहे.

अल्प व अत्यल्प भूधारक तसेच बहु भूधारक क्षेत्रातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकरी बांधवासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजना प्रति थेंब अधिक पिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक (२ हेक्टरपर्यंत क्षेत्र) शेतकऱ्यांना ५५ टक्के तर बिरसा मुंडा कृषि क्रांती स्वावलंबी योजना तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वालंबन योजनेंतर्गत ३५ टक्के असे एकूण ९० टक्के तर बहूभूधारक (२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र) शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून ४५ टक्के असे एकूण ९० टक्के अनुदान असणारी लाभदायी योजना आहे. ठिबक व तुषार घटकामुळे उत्पादनात व उत्पादकतेत मोठ्या प्रमाणात वाढ होऊन आर्थिकस्तर उंचावण्यात मदत होईल. तसेच पाण्याचा काटेकोर वापर झाल्याने तणांची वाढ रोखण्यास मदत होते आणि सिंचन क्षेत्रात वाढ होईल. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. लाडके यांनी केले आहे.

# लातूर येथे जिल्ह्यातील महायुतीच्या कार्यकर्त्यांचा रविवारी महामेळावा




**या पत्रकार परिषदेत भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख यांना दैनिक महावृत्तचे संपादक अशोक हानवते यांनी लोकसभेच्या इच्छुक उमेदवारांमध्ये कोण आहेत असा प्रश्न विचारला असता जिल्हा अध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी या प्रश्नाला उत्तर देत असताना लातूर लोकसभेसाठी आजपर्यंत फक्त खा. सुधाकर शृंगारे यांनीच उमेदवारी मागितली आहे, असे विधान केले, तेव्हा तात्काळ आ. रमेश अप्पा कराड यांनी प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया चालू व्हायची आहे. लोकसभेसाठी अनेकांचीमागणी आहे. पण आमच्यासाठी 'कमळा'चं फूल हाच उमेदवार आहे, असे स्पष्ट केले.**

लातूर दि.१२ :- केंद्रातील आणि राज्यातील सतेत्त सहभागी असलेल्या महायुतीचे सर्व घटक पक्ष एका विचाराने काम करत आहेत. येत्या काळात होणाऱ्या निवडणूका लक्षात घेऊन बूथ स्तरावर महायुती अधिक मजबूत व्हावी यासाठी जिल्ह्यातील महायुतीच्या कार्यकर्त्यांचा १४ जानेवारी २०२४ रविवार रोजी लातूर येथे महामेळावा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

महायुतीच्या वतीने लातूर येथे भाजपाच्या संवाद कार्यालयात शुक्रवारी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महायुतीतील भाजपाचे समन्वयक आ. रमेशआप्पा कराड, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे समन्वयक आ. बाबासाहेब पाटील, खा. सुधाकर शृंगारे, आ. अभिमन्यू पवार, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख अँड. बळवंत जाधव, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अँड. व्यंकट बेद्रे, जिल्हाध्यक्ष अफसरबाबा शेख, शहर जिल्हाध्यक्ष मकरंद सावे, आरपीआय आठवले गटाचे नेते चंद्रकांत चिकटे, जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे, लातूर लोकसभा निवडणूक प्रमुख राहुल केंद्रे, माजी आमदार सुधाकर भालेराव, माजी जिप अध्यक्ष पंडितराव धुमाळ, प्रशांत पाटील, बबन देशमुख, देविदास कांबळे, अशोक कांबळे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती प्रारंभी गुरुनाथ मागे यांनी प्रास्ताविक केले.

येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत देशात ४०० पार आणि राज्यात ४५ हून अधिक जागा जिंकण्याचा महायुतीच्या वतीने निर्धार करण्यात आला असल्याची माहिती देऊन आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, महायुतीच्या कार्यकर्त्यांचा १४ जानेवारी रविवार रोजी सकाळी ११ वाजता लातूर येथील गिरवलकर मंगल कार्यालयात महामेळावा आयोजित करण्यात आला आहे.

भाजपा शिवसेनेची युती ही तडजोड नव्हे तर तत्त्वावर आधारित केलेली युती आहे. राज्यातील महायुतीचे सरकार हे सर्वसामान्यांचे खानदानी सरकार आहे. शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख अँड. बळवंत जाधव म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश हितासाठी लोकसभा निवडणुकीत आम्ही सर्वजण एकत्रितपणे काम करणार आहोत.

भारतीय जनता पार्टी आणि पक्षश्रेष्ठी जो उमेदवार देतील त्या उमेदवाराला निवडून आणण्याची महायुतीच्या सर्वांची जबाबदारी असल्याचे सांगून आ. बाबासाहेब पाटील म्हणाले की, भाजप सेना युती सरकारमध्ये उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी कॉंग्रेस सहभागी झाले. राज्यस्तरावर ज्या पद्धतीने एकत्रित काम होत आहे त्याच पद्धतीने जिल्ह्यातही कार्यकर्त्यांचे मनोमिलन व्हावे याकरिता महायुतीचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे.

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वात संपूर्ण देश सर्वांगीण प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. अनेक विकासाच्या योजना प्रभावीपणे राबवल्या. विविध योजनेचा गरजूंना लाभ मिळाला असून देश मजबूत होण्यासाठी येणाऱ्या काळात मोदीजींना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी महायुतीचे आम्ही सर्व जण जिद्दीने, जोमाने कामाला लागलो आहोत असे खा. सुधाकर शृंगारे यांनी बोलून दिले.

यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना महायुतीच्या नेत्यांनी समर्पक उत्तरे दिली.

## संपादकीय....

# ..अंगना फूल खिलेंगे!

सर्जकतेच्या उत्कट बिंदूवरील व्यक्तीचे जाणे चटका लावणारे असते. राशिद खान यांचे निधन हे यात मोडते. भीमसेनजींस जाऊन एक तप लोटले. किशोरीबाई गेल्या त्यास सात वर्षे होतील.शाश्वततेची जी काही ठिकाणे आजच्या काळात होती त्यात राशिद खान यांचे स्वान्तसुखाय, तरीही श्रोत्यांना सतत जागे ठेवणारे गाणे होते.सर्जकतेच्या उत्कट बिंदूवरील व्यक्तीचे जाणे चटका लावणारे असते. राशिद खान यांचे निधन हे यात मोडते. भीमसेनजींस जाऊन एक तप लोटले. किशोरीबाई गेल्या त्यास सात वर्षे होतील. चार वर्षांपूर्वी जसराजजी गेले. मालिनीबाई राजुरकर अलीकडेच निवर्तल्या. आमच्या पिढीस गाण्यातील गंधर्वत्व आणि अलौकिक आध्यात्मिकता उमजण्याच्या आधीच कुमारजी आणि मल्लिकार्जुनअण्णा निघून गेले. या सगळय़ांचे जाणे नि:संशय वेदनादायी होते. पण त्या वेदनेस अपरिहार्यतेच्या वास्तवाची शहाणीव होती. राशिद खान यांच्या निधनाच्या वेदनेची गहिराई आणि त्यामुळे उमटलेल्या ओरखडय़ाचा पोत या सगळय़ांपेक्षा वेगळा आहे. आपल्या डोळय़ासमोर, आपल्या बरोबरीने वा मागे-पुढे एखादे वर्ष असलेल्या एका तरुणाचे उस्तादात रूपांतर होताना पाहणे आणि त्या उस्तादाकडून आपल्या स्वरापेक्षांची पूर्तता होणार याची आनंदी खात्री असताना अचानक त्या व्यक्तीने जाणे याचे हे दु:ख! या दु:खाची जातकुळी त्यामुळे वेगळी. भीमसेनजी, किशोरीबाई, मालिनीबाई, मन्सूरअण्णा, कुमारजी वगैरे कलात्मक परिचय झाल्यापासून महानच होते. राशिद खान त्या इंद्रधनुषी मार्गाने निघालेले होते. वरील सर्व महानुभावांना त्या इंद्रधनुष्यावरील ठहरावाची संधी मिळाली. त्यांच्या तेथील वास्तव्याचा आनंद आपणा सर्वास मनमुराद मिळाला. त्यांच्या कलात्मक विभ्रमाचे अस्तित्व आसुसलेल्या कानांनी उपभोगता आले. पण राशिद खान यांच्याबाबत मात्र हे इंद्रधनुष्यी वास्तव्य अवकाळी संपुष्टात आले. म्हणून या दु:खाची तीव्रताही अधिक.तसे पाहू जाता अवकाळीची सवय व्हावी असा हा काळ. भरवशाच्या म्हशी टोणग्यांवर टोणगे प्रसवत असताना शाश्वतता ही संकल्पनाच अशाश्वत आहे किंवा असा प्रश्न पडणे साहजिक. अशा काळात जी काही शाश्वततेची ठिकाणे होती त्यात राशिद खान यांचे गाणे होते. ते कोणत्या घराण्याचे, तालीम कोणाची वगैरे व्याकरणात जाण्यात काही अर्थ नाही. भाषेच्या आनंदासाठी व्याकरणाचा परिचय जीवनावश्यक नसतो. राशिद खान यांच्या गाण्यातून मिळणारा आनंद या सांगीतिक व्याकरणावर दशांगुळे उभा ठाकत असे. त्यांनीच 'लोकसत्ता'च्या ''बस.. एक छुरी हलके से चली जाती है'' ('लोकरंग', २८ जुलै २०१९) या लेखात म्हटल्याप्रमाणे या व्याकरणाच्या वजनाने त्यांना कधी दबवले आणि दमवलेही नाही. परंपरा, व्याकरण, पूर्वसुरींचा प्रवास इत्यादी कशानेच त्यांचे दबून न जाणे हे त्यांच्या गाण्यातून कळत असे. त्यांचे गाणे मोकळे-ढाकळे होते. कलाकार हा मोकळा-ढाकळा असला की 'हाताळायला' सोपा असतो. त्या अर्थाने त्यांचे नाते भीमसेनजी, कुमारजी वा मल्लिकार्जुनअण्णा यांच्याशी लागते. त्यांच्या गाण्यातल्या या मोकळेपणातच कदाचित भीमसेनजींनी आपले स्वत:चे प्रतिबिंब पाहिले असणार. त्याचमुळे हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताचे भविष्य असे राशिद खान यांचे वर्णन भीमसेनजींनी केले.पण तरीही आपल्या खांद्यावर शास्त्रीय संगीताच्या भविष्याची पताका आहे, असे राशिद खान यांनी कधी दाखवले नाही आणि ते तसे कधी वागले नाहीत. उस्तादी असो वा पंडिती. शास्त्रीय संगीतातील बुजुर्ग स्वत:च्या बुजुर्गतेच्या कोषात अडकतात. भीमसेनजी, कुमारजी, मल्लिकार्जुन वगैरेंची महत्ता ते त्या कोषात अडकले नाहीत म्हणून आहे. राशिद खान दर्जाने यांच्याच पिढीचे आणि वयाने आजचे. जुन्या-नव्याचा इतका उत्कृष्ट सांधा त्यांच्याइतका अन्य नाही. तरुणांपैकी काही परदेशस्थ मंडळी जुन्यांच्या स्वरलिपीचे पाठांतरी सादरीकरण करतात अथवा तितकेही ज्यांना जमत नाही ते अचकट-विचकट काहीबाही करून नवेपणा मिरवतात. राशिद खान यांना असे काहीही करावे लागले नाही. स्वत:च्या गाण्यावर त्यांचा ठाम विश्वास होता. या क्षेत्रात थोडेच कलाकार असे आहेत की ज्यांची बैठक पार पडली, असे म्हणण्याची वेळ येत नाही. राशिद खान यांतील एक. अलीकडे विलंबितात सोडाच, पण मध्यलयीतही फार कोणी थांबण्याच्या फंदात पडत नाही. सगळी घाई द्रुतलयीतील चमत्कृती, तबलजींशी 'झगडा' वगैरेंतून टाळय़ा कधी मिळतील याची. राशिद खान पहिल्या दोन्ही टप्प्यांत निवांत विहरायचे. लहान लहान पक्ष्यांना तरंगते राहण्यासाठी फार पंख फडफडवावे लागतात. गरुड मात्र आपल्याच आनंदात हवे तितके तरंगू शकतो. राशिद खान असे स्वरलयींच्या दोन्ही पंखांवर आपल्याच मस्तीत 'फिरत' राहायचे. कलाकृतीची, म्हणजे अर्थातच कलाकाराचीही, वाटचाल 'चांगली/ चांगला' येथपासून उत्तम, महान येथपर्यंत कधी होऊ लागते, या प्रश्नाचे उत्तर समजून घ्यायला सोपे पण अमलात आणण्यास अत्यंत अवघड असे आहे. एखादा कलाकार काहीही सिद्ध करायचे नाही या अवस्थेला पोहोचतो त्या वेळी तो केवळ चांगला राहत नाही; तो उत्तम, महानतेच्या वाटेला लागतो.राशिद खान यांची बैठक काहीही सिद्ध करण्यासाठी नसायची. आपण गातो ते उत्तम आहे हे वयाच्या अवघ्या ११ व्या वर्षीच उमगलेले. बडय़ा बडय़ा बुजुर्गाची मान्यताही कधीचीच मिळालेली. इतरांचे ऐकून मनातल्या मनात घोटवण्याच्या वयात राशिद खान उस्तादपदास पोहोचलेले. त्यामुळे त्यांचे नंतरचे गाणे स्वान्तसुखाय आणि म्हणून इतरांनाही सुखावणारे असे. अशा कलाकारांच्या वर्तनात स्वत:विषयी 'मी आहे हा असा आहे' अशी एक लोभस मस्ती (मराठी अर्थाने नव्हे) असते. राशिद खान यांच्या संपूर्ण सादरीकरणात ती असायची. संपूर्ण सादरीकरणात याचा अर्थ केवळ सांगीतिक नाही. ते गाणेच नाही; तर स्वत:लाही ज्या तऱ्हेने पेश करायचे त्यातून ही मस्ती दिसून यायची. अशी अवस्था एकदा आली की कलाकार प्रयोग करण्यास घाबरत नाही आणि पोथीनिष्ठही राहत नाही. त्याचमुळे कोलकात्यात नवरात्रीतल्या 'दुर्गो पुजो'च्या दिवसात स्वत:च्या घरी माता सरस्वतीची प्राणप्रतिष्ठा करून 'तुम बिना सुना संसार' असे ते सहज आळवू शकत आणि लुई बँक्स यांच्या पाश्चात्त्य सांगीतिक सादरीकरणात सहज सहभागी होत. 'जश्न-ए-रेखता'च्या अनेक जवांदिल कार्यक्रमांत हजारो तरुण-तरुणी राशिद खान यांना ऐकत तासनतास बसत. भारतीय संस्कृतीतील भद्र, मंगल यांचे दर्शन शास्त्रीय संगीतात सहज होते. म्हणूनच जन्माने मुसलमान, तेही उत्तर प्रदेशी, वाढले-बहरले पश्चिम बंगालात.. अशा राशिद खान यांना मनापासून सांगीतिक श्रद्धांजली कोणास वाहावीशी वाटते? तर गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांस.

# स्वामी विवेकानंद जगाच्या पाठीवरील महान युगपुरुष

स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला.स्वामी विवेकानंद यांची आवड आणि अभ्यास प्रगल्भ होता.त्यांना संगीत, साहित्य आणि तत्वज्ञान यात विशेष रस होता.याव्यतीरीक्त पोहणे, घोडेस्वारी व कुस्ती हे त्यांचे आवडते छंद होते. वयाच्या २५ व्या वर्षी स्वामीजींनी वेद,पुराण, बायबल, कुराण,धम्मपद,तनाख, गुरू ग्रंथ साहिब,दास कॅपिटल, भांडवलशाही, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या सर्वच विचारधारा एकत्र केलेल्या होत्या.म्हणजे त्यांना इतर सर्व ज्ञान तर होतेच परंतु जगातील संपूर्ण धर्माचा अभ्यास त्यांनी अवगत केलेला होता.यावरून असे वाटते की स्वामी विवेकानंदांना संपूर्ण ब्रम्हांडाचे ज्ञान असल्याचे दिसून येते. याला दैवी शक्तीच म्हणावे लागेल.कालांतराने रामकृष्ण परमहंस यांच्या आश्रयाला गेले व रामकृष्ण परमहंस यांच्या रहस्यमय व्यक्तीतत्वाने ते अत्यंत प्रभावीत झाले आणि त्यांचे संपूर्ण जीवन बदलले.स्वामींनी १८८१ मध्ये रामकृष्ण परमहंस यांना आपले गुरू केले.१८८६ मध्ये रामकृष्ण परमहंस यांच्या मृत्यूनंतर स्वामी विवेकानंदांच्या कार्याला एक नवीन वळण आले.वयाच्या २५ व्या वर्षी त्यांनी भगवे वस्त्र धारण केले व संपूर्ण भारतभर पायी प्रवास सुरू केला.देशातील गरीबी आणि सामाजिक दुष्टांची अवस्था पाहून त्यांची मनस्थिती दु:खावली गेली.काही दिवसांतच शिकागो येथे जगातील धर्म परिषद होणार असल्याची माहिती मिळाली.११सप्टेंबर १८९३ ला शिकागो येथे जगातील धर्म परिषद भरली.भारताचे प्रतिनिधी म्हणून स्वामी विवेकानंद तेथे पोहोचले.तिथे अनेकांनी खूप प्रयत्न केले की स्वामी विवेकानंद यांना बोलायला वेळ मिळुन नये.परंतु एका अमेरिकन प्राध्यापकाच्या प्रयत्नाने त्यांना बोलायला थोडा वेळ मिळाला.त्यानी जागतिक धर्म परिषदेतील धर्म संसदेतील भाषणाची सुरुवात बंधु व भगिनीअसे करून केली. यानंतर त्यांच्या भाषणाचे विचार ऐकून संपूर्ण धर्म परिषद स्तब्ध झाली व टाळ्यांचा कडकडाट झाला जनुकाय आकाशवाणी झाली की काय आणि स्वामी विवेकानंद जगप्रसिद्ध झाले व त्यांचे अमेरिकेत जोरदार स्वागत झाले. युगानुयुगे आपल्या तेजस्वी विचारांची ज्योत संपूर्ण जगात सकारात्मक व शांती प्रदान करणारी रहावी या उद्देशाने स्वामी विवेकानंद यांनी आपले कार्य पुढे सुरूच ठेवले. एकतेचा संदेश जगाला देऊन सर्व मानवजातीला बंधुतेचा, मानवतेचा संदेश देणारे व सुखशांती निर्माण करणारे कार्य स्वामी विवेकानंद यांनी केले.त्यांनी जगाचा इतिहास आणि पाश्चात तत्वज्ञानांचा अभ्यास महाविद्यालयीन जीवनातच केला. अनेक धर्माच्या तात्विक अभ्यासामुळे त्यांनी अमेरिकेतील शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्म परिषदेत हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व त्यांनी केले. ११ सप्टेंबर १८९३ या दिवशीच्या त्यांच्या भाषणाने संपूर्ण सभा प्रभावित झाली व १७ दिवसाच्या या परिषदेत हिंदुस्थानातील प्रभाव दिसून आला.मुलांचा सर्वांगीण विकास व त्यांच्या कौशल्यांचा विकास व्हावा, मुले आत्मनिर्भर व्हावी असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांच्या या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता आजच्या युवा पिढींनी अवगत करायला हवी.मूलांचा शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक विकास होऊन मन,बुद्धी विकसित करणारे, स्वावलंबी, चारित्र्यसंपन्न ओळख निर्माण करणारे शिक्षण असावे असे त्यांचे मत होते. भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीबद्दल गाड अभिमान असला, तरी त्यात शिरलेल्या अनिष्ट रुढी, परंपरा, जातीभेद यांसारख्या हीन गोष्टींवर त्यांनी भाषणांतून कडाडून हल्ला चढवला. निराकार समाधीत मन रहाण्याची स्वत:ची स्वाभाविक प्रवृत्ती बाजूला सारून त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या सुखदु:खाचा योग्य पातळीवरही विचार केला आणि त्यांच्यासाठी झटले व सर्वस्वाचे समर्पण म्हणजेच खरा संन्यास' हे वचन सार्थ केले. स्वामी विवेकानंद हे सर्व तरुणांचे आजही प्रेरणास्थान आहेत. अशा या महान तत्त्वज्ञानी महापुरुषाला माझा सलाम.आज देशात आपल्याला जी काही एकता आणि बंधुता दिसून येत आहे त्याचे संपूर्ण श्रेय स्वामी विवेकानंदांना जाते.१८९९ साली स्वामीजींनी पुन्हा पश्चिमेकडे प्रवेश केला आणि भारतीय संस्कृतीचा, अध्यात्माचा संदेश प्रसारित केला. अशाप्रकारे परदेशातही त्यांनी भारताची भूमिका मांडण्याचे काम त्यांनी केले.असा तेजस्वी महापुरुष भारत भुमिला लाभला हे भारतीयांचे अहोभाग्यच आहे.आजही आपला देश स्वामी विवेकानंदांच्या विचारधारेवर चालतो ही भारतीयांसाठी स्वाभिमानाची बाब आहे.अशा महापुरुषांनी पुन्हा-पुन्हा जन्म घ्यावा असे वाटते.परंतु आजही स्वामीजींची आस्था सर्वांच्या ह्रदयात घर करून आहे.मी संपूर्ण भारतवासीयांना विनंती करतो की स्वामी विवेकानंदांचे विचार अवश्य अवगत करावे. आपणा सर्वांचाच मार्ग सुखरूप व मोकळा होईल.जोपर्यंत सुर्य, चंद्र,तारे, आकाश-पाताळ आहेत तोपर्यंत स्वामीजींचे विचार सर्वांच्याच ह्रदयात राहिल.स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त सरकारने, सामाजिक संघटना, शाळा-महाविद्यायासह संपूर्ण युवावर्गानी आजच्या दिवशी वृक्षलागवड केली पाहिजे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण मानव जातीला आणि प्राणीमात्रांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे अनेकांचे प्राण आपल्याला वाचविता येईल.स्वामीच्या जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!

**************

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

# घराघरात राष्ट्रमाता जिजाऊ निर्माण झाल्या पाहिजेत.

छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांना घडविण्यात राष्ट्रमाता जिजाऊ सारखी दुरदुष्टी आजच्या सर्व मातानी ठेवली तर आमच्या ही घराघरात छत्रपती शिवाजी महाराजा सारखे शूरवीर निर्माण होतील. राष्ट्रमाता जिजाऊ ही इतिहास घडविणारी एक महान स्त्री झाली होती.स्वराज्य निर्माण करण्यासाठी गोरगरिब,शेतकऱ्यावर विविध जाती धर्माच्या मराठी मावळ्यांवर दया दाखविणारी कारूण्यमूर्ती होती. त्यामुळेच शिवाजी महाराजाच्या कृतीतून कार्य सिद्धीस नेण्यासाठी लागणारी प्रेरणामूर्ती जिजामाता होती. हे जरी शंभर टक्के सत्य असले.तरी मराठयाच्या मनावर जिजामाते पेक्षा भवानीमातेचे वर्चस्व आज ही कायम राहत असेल तर राष्ट्रमाता जिजाऊ कशा निर्माण होतील?. स्वराज्य निर्माण करण्याची इच्छा जिजामातेची म्हणजे एका स्त्रीची होती.परंतु गेले अनेक शतक आम्ही राज्याच्या आणि केंद्राच्या अभ्यास क्रमातील इतिहासाच्या धड्यातून स्वराज्य निर्माण करणे हि श्री ची इच्छा आहे.हे विद्यार्थी दक्षे पासुन शिकविले आणि बिंबविले जाते.त्यामुळे जिजामाते पेक्षा भवानी मातेचे भक्त होणेच मराठा समाजातील महिलांनी जास्त पसंत केले आहे.मराठा सेवा संघाच्या प्रबोधनाने मराठा समाजात मोठ्या प्रमाणात जागृती होत आहे.त्यामुळे एक घोषणा सर्व ठिकाणी निनादते एकच वारी बारा जानेवारी यांची खरच अंमलबजावणी झाली.तर शेगांव,शिर्डी आणि पंढरपूरच्या पायी यात्रा निश्चित बंद होतील. त्यामुळे मराठाच नव्हे तर लाखो बहुजन समाजात करोडो रुपयाची बचत होईल.आणि आपल्या मुलामुलींना स्वराज्य निर्माण करण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ निर्माण होती.म्हणुन एकच वारी बारा जानेवारी ही केवळ घोषणा नाही.क्रांतिकारी मंत्र होईल.



भारतात मुलांना घडविताना त्यांना रामायण महाभारतातील कथा सांगून त्याच्यावर संस्कार केले जातात.त्यांना शाळा कॉलेज मधून हे शिकविल्यावर कोण कसा छत्रपती शिवाजी राजा निर्माण होईल?. स्वराज्याचे राजे असलेले मराठे आज सर्वच मनुवादी विचारधारा असलेल्या पक्षाचे गुलाम झाले आहेत.राज्यातील २८८ आमदारात १४५ मराठा समाजाचे आमदार आहेत.हे लिहतांना मला लाज वाटते त्यांना मराठा म्हणण्याची.म्हणुन त्यांना गुलामच म्हटले पाहिजे.हे बेशरम पणे मराठा क्रांती मोर्चात सहभागी झाले होते.बहुजन क्रांती मोर्चा मुळे खरेच मराठा समाजात खूप मोठे प्रबोधन झाले ते इतिहास वाचायला लागले. आरक्षण मागायला लागले आणि शिवसेनेच्या बॅनर,पोस्टर वरून छत्रपती शिवाजी महाराज गायब झाले.का कसे माहिती नाही.मग मराठा सरदार,शिवसैनिकांवर कोणते संस्कार झाले?.

रामायणातील संस्कार कोणाला ही शूरवीर बनण्याची प्रेरणा देत नाही.तर दुसऱ्या करीता कसे मरावे त्याची प्रेरणा रामायणात मिळते. तर महाभारताचे संस्कार अधर्माने कसे मारावे याचे अनेक उदाहरण देऊन त्याचे प्रशिक्षण दिले जाते.असे संस्कार शिवाजी महाराज यांच्यावर झाले असते तर त्यांनी मावळ्याची फौज उभी करून परकीय शत्रू आणि घरभेद्याशी लढाई केली नसती.शत्रू सर्व शक्तीने बलाढ्य आहे.हे माहित असूनही शिवाजी महाराज कधीच हिंमत हारले नाहीत. ती हिंमत लहानपणा पासून त्यांच्यात निर्माण करणारी माता जिजाऊ त्याच्या मागे सदैव उभी होती.आज कालच्या माता मुलामुलीच्या मनात हिंमत निर्माण करण्या ऐवजी प्रचंड भिती निर्माण करतात.त्याच्या पासून सावध राहण्याची सतत त्याची कान उघडनी करतात. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाचा उद्धार करी अशी म्हण खूप प्रसिद्ध आहे.जी माता स्वताच्या कुटुंबाची काळजी घेण्यास आपल्या मुलावर संस्कार करते.ती त्याला जगाची उगाच उठाठेव करू नको अशी सतत तंबी देते.ती जगा बाबत विचार करूच शकत नाही. त्यात एखादीच जिजामाता,सावित्रीमाता,रमाईमाता,अहिल्याबाई,ताराबाई तयार होतात.जगात आदर्श निर्माण करतात. इथे शालिनीताई,प्रतिभाताई,प्रभाताई,शोभाताई,मीनाताई,निलमताई निर्माण झाल्या.त्यांना शिवाजी जिजाऊ कधीच आदर्श नव्हता. त्या गुलामांच्या गुलाम होत्या.त्यांच्या कडून राज्याच्या रयतेने कधीच अपेक्षा ठेवल्या नाहीत.

परकीय गुलामगिरीचे साम्राज्य पसरले असताना.जवळपास पंधराशे वर्षाच्या प्रदीर्घ काळानंतर राष्ट्रमाता जिजामातेने छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपाने बहुजन समाजाच्या प्रेरणांना,अस्मितेला जन्म दिला आज आम्ही जरी बहुजन समाज हा शब्द वापरत असलो तरी त्यावेळी दऱ्या खोऱ्यात राहणाऱ्या सर्व जाती जमाती आदिवासीना जिजामाता व शिवबांनी मावळे म्हणून गोळा केले होते.तेव्हा या सर्व बहुजनांना ज्ञानबंदी,वर्णबंदी,जातबंदी,रोटीबंदी,बेटीबंदी,शस्त्रबंदी,समुद्रबंदी होती.या सर्व बंदया प्रथम जिजामाताने आपल्या बाळ शिवाजीला तोडण्यास लावुन मावळ्याची मुंग्यांसारखी फौज निर्माण केली. मुंग्या कितीही छोट्या असल्या तरी त्या एकत्र एखाद्या किड्यावर तुटून पडल्यावर त्याला जिवंत मारतात.व सर्व एकत्र येऊन त्याला वाहुन नेतात.या मुंग्यांच्या एकजुटीतुन शिवाजी महाराजांनी प्रेरणा घेतली.आणि सर्व जातीधर्माच्या चौकटीत बंदिस्त असलेल्या कष्टकरी गोरगरीब पण शरीराने आडदांड असलेल्या तरुणांना मावळे म्हणून गोळा केले.

सम्राट अशोकाच्या नंतर हजारो वर्षाची गुलामगिरीची समाज व्यवस्था झुगारून छत्रपतीच्या गादीचा वारसा निर्माण केला. चंदगुप्त मौर्या,सम्राट अशोकाचा वारसा आणि रयतेच्या विचाराचे स्वराज्य निर्माण करून त्याची रीतसर स्थापना केली. जिजामातेमुळे केवळ एका मातेचा किंवा मातृत्वाचा गौरव झाला नाही.तर त्यापेक्षा आमच्या मातृसत्ताक संस्कृतीचा गौरव झाला.यांचे भान आजच्या आरक्षण मांगणाऱ्या मराठा क्रांतीची भाषा करणाऱ्या मराठ्यांना नाही.मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो,मूर्ती वापरली जाते,पण विचारांचे प्रतिबिंब कुठे ही दिसत नाही.

५७ मोर्चे काढणारा एक मराठा लाख मराठा समाजाच्या १४५ आमदारांनी मराठा आरक्षणा करीता राजीनामा देऊन निवडणूक घेण्यासाठी राज्यपाला समोर प्रस्ताव दाखल केला असता तर राज्याचे संपूर्ण मंत्रीमंडळ मराठा समाजाचे असते.१४५ आमदार वेगवेगळ्या पक्षाचे असल्यामुळे ते सभागृहात तोंड उघडू शकत नाही.भारतीय संविधान निर्माते त्यांची ती एकजातीय दादागिरी जाणुन होते म्हणुन त्यांनी तशी तरतुद लिहून ठेवली.म्हणुन ते मोर्चात सहभागी झाले होते.छत्रपती शिवाजी महाराजाचा वारसा सांगणारे पक्ष,संस्था,संघटना जिजामाताची जयंती साजरी करताना दिसत नाही. पण ममता दिन मात्र मोठ्या उत्सवात गटागटाने प्रमुख गल्लीबोळात साजरा करताना दिसतात.ममता,समता,करुणा यांचा थांगपत्ता नसलेल्या माताचा नऊ दिवस कडक उपवास आणि नऊ दिवस नऊ रंगाची उधळण केली जाते. ज्यांच्या आईवडीलाचा पत्ता नाही,कुठे जन्मले?.गांव,तालुखा,जिल्हा,राज्य कोणते तेच कधी कळले नाही अशा मातांना प्रिंट मीडिया,चॅनल मीडिया रात्रंदिवस प्रसिद्धी देऊन महिलांच्या मनावर परिणाम कारक आधुनिक तंत्रज्ञान व्हिडिओ कॉमेरा वापरुन जादू चमत्कार करून दाखविते, मात्र जिजामाता,सावित्रीमाईचे जन्मा पासून मृत्यू प्रयन्त सर्व इतिहास माहित असूनही त्याबाबत लिहल्या आणि दाखविल्या जात नाही.

छत्रपती शिवाजी महाराजाना आद्यदैवत मानणारे जेव्हा त्याच्या मातोश्रीचे चरित्र हरण करून विटंबना केल्या गेली. तेव्हा एकदाही रस्त्यावर उतरून खळ्ळयाय खःटाक आवाज केला नाही.अन एका धातूच्या पुतळ्याला माती लागताच उभा महाराष्ट्र पेटविला होता.यालाच आईचे व दाई प्रेम म्हणतात.छत्रपती शिवाजी महाराज आणि राष्ट्रमाता जिजाऊचे चरित्र हरण करणाऱ्यांना महाराष्ट्र भूषण देऊन गौरवल्या जाते. राज्यातील मराठ्यांना हे दिसते तरी पण स्वार्था करीता हे त्यांचे गुलामी स्विकारतात. छत्रपती शिवाजी महाराज व जिजाऊच्या चरित्रावर लिहणाऱ्यानां पिता समान मानुन मनसे सेवा करणारी ही औलाद मराठा समाजातील तरुण तरुणीला कशी दिसली नाही.त्यांच्या एका इशाऱ्यावर महाराष्ट्रात तोडफोड करून धुमाकुळ घालणारी ही पोर कोणत्या मातेची आहेत?. त्यांना राष्ट्रमाता जिजाऊ,छत्रपती शिवाजी महाराजाची आई संस्कार मूर्तीची आठवण होत नाही.मग कशा राष्ट्रमाता जिजाऊ निर्माण होतील?. अशा जातीशी बेईमानी करून परकीयांची गुलामगिरी करणाऱ्या मराठी बहुजन समाजाचे अज्ञान कधी दूर होणार?.त्याने स्वजातीचा इतिहास वाचला पाहिजे,स्वता जागरूक होऊन समाजाला जागृत केले पाहिजे,म्हणुनच एकच वारी बारा जानेवारी स्वाभिमानी मराठा बहुजन समाजाच्या घराघरात राबविली पाहिजे. आणि घराघरात राष्ट्रमाता जिजाऊ निर्माण झाल्या पाहिजेत. हिच राष्ट्रमाता जिजाऊ च्या जयंती निमित्त अपेक्षा.राष्ट्रमाता जिजाऊ ४२६ व्या जयंती निमित्त हार्दिक शुभेच्छा आणि राष्ट्रमाता जिजाऊच्या क्रांतिकारी विचारांना आणि प्रतिमेला कोटी कोटी प्रणाम !!!.

********************

सागर रामभाऊ तायडे,
भांडूप,मुंबई
९९२०४०३८५९.

# खून प्रकरणातील आरोपीला हैदराबाद मधून अटक. स्थानिक गुन्हे शाखा व विवेकानंद चौक पोलीस स्टेशन ची संयुक्त कारवाई.

लातूर :- खून प्रकरणातील आरोपीला हैदराबाद मधून अटक. स्थानिक गुन्हे शाखा व विवेकानंद चौक पोलीस स्टेशन ची संयुक्त कारवाई. याबाबत थोडक्यात माहिती अशी की, पोलीस ठाणे विवेकानंद चौक हद्दीतील ताजुद्दिन बाबा नगर, लातूर परिसरात दिनांक ०६/०१/ २०२४ रोजी मध्यरात्री कुणीतरी अज्ञात आरोपीने दर्गा परिसरात झोपलेला फारुख उर्फ मुकड्या सुजातली सय्यद याचा अज्ञात कारणासाठी तीष्ण हत्यार्याने, डोक्यात,गळ्यावर, हातावर मारहाण करून खून केल्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १२/ २०२४ कलम ३०२ प्रमाणे खुणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.गुन्ह्याचा तपास विवेकानंद पोलीस करीत होते. सदर गुन्ह्यातील मयत हा सराईत व रेकॉर्ड वरचा गुन्हेगार होता. विविध पोलीस ठाण्याला संबंधित मयतावर शरीराविषयी व मालाविषय अनेक गंभीर गुन्हे दाखल होते. तसेच तो गुंड प्रवृत्तीचा असल्याने अनेकांशी त्याचे शत्रुत्व होते. त्यामुळे त्याचा खून नेमका कोणी व कशामुळे केला यासंदर्भात मोठ्या प्रमाणात संभ्रम होता. तसेच परिसरातील नागरिकाकडून गुन्ह्याच्या तपासात काही एक उपयुक्त माहिती मिळत नव्हती. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सदर गुन्ह्याचा उलगडा करून




गुन्ह्यातील अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी मार्गदर्शन व सूचना करीत होते. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) भागवत फुंदे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले व विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे व पोलीस ठाणे विवेकानंद चे संयुक्त पथक तयार करून गुन्ह्यातील अज्ञात आरोपीचा शोध घेण्यात येत होता. दरम्यान पथकाकडून रेकॉर्डवरील अनेक गुन्हेगारांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे विचारपूस करण्यात येत होती.

सदर पथकाला मिळालेल्या गोपनीय व सायबर सेल कडून मिळालेल्या तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून नमूद गुन्ह्यातील संशयित आरोपी हा हैदराबाद येथे लपून बसलेला असल्याची माहिती मिळाली.

त्यावरून संयुक्त पथकातील पोलीस उपनिरीक्षक अनिल कांबळे, पोलीस अमलदार रियाज सौदागर, योगेश गायकवाड व आनंद हल्लाळे यांचे पथक तात्काळ तेलंगाना राज्यातील हैदराबाद येथे रवाना होऊन हैदराबाद मधील बोराबंडा परिसरात सापळा लावून अतिशय सीताफिने नमूद गुन्ह्यातील संशयित आरोपीला दिनांक ११/०१/२०२४ रोजी ताब्यात घेऊन पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथे आणले. पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथे आणून सदर संशयित आरोपीला विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव समीर उर्फ जालीम अखिल शेख, वय २४,वर्ष राहणार ,साळे गल्ली,बौद्ध नगर, लातूर.


असे असून रात्री झोपलेल्या फारुख उर्फ मुकड्याच्या खूनाच्या कारणाची विचारपूस केली असता नमूद मयत खर्चसाठी वारंवार पैशाची मागणी करीत होता. समीर याने मयताला अनेक वेळा पैसेही दिले. परंतु नमूद मयत समीर कडे रोजच पैशाची मागणी करू लागला होता. पैसे न दिल्यास तो समीरला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देत होता. याला कंटाळून समीरने रात्रीच्या वेळी उघड्यावर झोपलेल्या फारूक उर्फ मुकड्या याच्या डोक्यात फरशी घालून व नंतर गळ्यावर चाकूने मारून खून केल्याचे सांगितले.

समीर उर्फ जालीम अखिल शेख याला पोलीस ठाणे विवेकानंद येथे दाखल असलेल्या खुनाच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली असून समीर याचे विरुद्ध याआधी पण पोलीस ठाणे गांधी चौक येथे जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे विवेकानंद चौक चे सहाय्यक पोलीस निरीक्षक नाना लिंगे व पोलीस अमलदार वाजिद चिखले हे करीत आहेत.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात व उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) भागवत फुंदे, स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे नेतृत्वातील संयुक्त पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक पल्लेवाड, नाना लिंगे, घारगे पोलीस उपनिरीक्षक अनिल कांबळे, केंद्रे ,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार रियाज सौदागर,योगेश गायकवाड, राजेश कंचे,पोलीस ठाणे विवेकानंद चे पोलीस अमलदार आनंद हल्लाळे, रमेश नामदास, वाजिद चिखले, सायबर सेलचे पोलीस अमलदार गणेश साठे,शैलेश सुडे यांनी केली आहे.

# रयतेला माया लावणाऱ्या राजमाता जिजाऊ

महाराष्ट्राच्या इतिहासात १२ जानेवारी ला अत्यंत महत्व आहे. कारण १२ जानेवारी हा दिवस सर्वसामान्य लोकांच्या जिवनात आमुलाग्र बदल घडवून आणणारा दिवस आहे. १२ जानेवारी मुळे या देशात एक क्रांती होण्याची सुरवात होऊन सर्व सामान्य जनतेला प्रेमाची व आपुलकी ची माया लावणारे मातृत्व जन्माला आले. माणसाला माणवाचे संस्कार देऊन विषमतेवर प्रहार करणाऱ्या मातेचा जन्म दिवस हा संपूर्ण भारत भर आनंदोत्सव म्हणून साजरा व्हायला पाहिजे होता. परंतु हजारो वर्षापासून चालत आलेली विषमता, अज्ञान, अंधविश्वास आणि एकाच वर्णाचे वर्चस्व यामुळे वास्तविक कर्म करणाऱ्या, माणसासाठी लढणाऱ्या, समतेसाठी लढा देणाऱ्या, अंधविश्वास व अज्ञाना विरोधात आवाज उठवणाऱ्या महानायक व महानायीका यांना या विषमतावादी व स्वंयश्रेष्टत्ववादी व्यवस्थेने समोर येऊच दिले नाही. शिक्षण एकाच वर्णाची खाजगी मालमत्ता समजून एकाच वर्णाचे वर्चस्व कायम रहावे म्हणजे अनेक काल्पनीक, अतार्किक लिखाण करून लोकांना माणसिक गुलाम करण्याचे काम येथील साहीत्यांनी केले. परंतु ज्यांनी स्व कर्त्वत्वाने अनिष्ठ रूढी परंपरा, अंधविश्वास, अज्ञान, थोतांड, पाखंड बाजुला सारून मानव कल्याणाचे काम केले त्यांच्या बद्दल एकही चांगला शब्द न लिहणारे, ज्यांनी समता, मानवता याबद्दल लिखाण करून प्रबोधन केले त्याला नष्ट करणारे लोक वैचारिक दृष्टीने परिपक्व कसे असतील हा प्रश्न निर्माण होतो. इतिहास घडवणाऱ्या महान लोकांनी इतिहास लिहला नाही. ज्यांनी इतिहास लिहला त्यांनी कर्मापेक्षा स्वतःच्या वर्णाला श्रेष्ठ लेखून इतरांचे महान कार्य लेखणीभेदातुन दुर्लक्षित केले. जर त्यांनी इतिहास घडवला त्यांचे वास्तविक कार्य लिहून ठेवले असते तर खरा पराक्रमी इतिहास समोर आला असता. परंतु शोकांतिका आहे की विषमतावाद, अंधविश्वास टिकवून ठेवण्यासाठी सत्याची व तर्काची हत्याच केली गेली. तुकाराम महाराजांच्या गाथा बुडवणारे माँ जिजाऊ वर लिखाण करतील म्हणजे नवलच. जिजाऊंच्या कार्यावर विचारावर जर लिखाण झाले असते तर जिजाऊंचे कार्र भारतभर पसरले असते. जिजाऊंच्या जन्मानंतर त्यांच्या स्वागतासाठी हत्तीवरून साखर वाटून समाजा समोर ठेवलेला आदर्श स्त्रियांना हीन माणणाऱ्या विकृतीला सुरुंग लावणारा होता. मॉ जिजाऊ यांचे बालपण अगदी थाटामाटात व लाडात गेले असले तरीही लोकांचे दुःख, राजेशाही चा छळ व लोकांचे शोषण जिजाऊंच्या नजरे पासून लपु शकले नाही. लोकांचा छळ व शोषण थांबण्यासाठी स्वराज्याची संकल्पना मांडणाऱ्या माँ जिजाऊ साहेब दूरदृष्टी असलेले व्यक्तीमत्व होते हेच दिसून येते.



जातीव्यवस्था, विषमता, मोडीस काढून मावळा म्हणून एकत्रीत करून स्वराज्याची पायाभरणी करणाऱ्या जिजाऊ किती कर्तृत्व वान असतील याची कल्पना येते. शिवबाला लहानपणापासून शौर्य, पराक्रम आणि समतेचे धडे देणाऱ्या जिजाऊंचे शौर्य हे कोणत्याही मापात मोजता येत नाही. मॉ जिजाऊंनी केलेल्या स्वराज्याची पायाभरणी ही शिवबाच्या हातुन करून घेताना राज्यात कोणत्याही व्यक्तीचे शोषण वा छळ होणार नाही असे संस्कार रुजवले आणि गुन्हेगार कोणत्याही जाती धर्माचा असला तरीही माफ करायचे नाही हि जिजाऊंची शिकवण छत्रपती शिवाजी महाराज यांनी आयुष्यभर जोपासली. म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांनी अफझलखानाचा कोथळा बाहेर तर काढलाच त्याचबरोबर कृष्णा कुलकर्णी चे दोन तुकडे केले. महिलांकडे वक्रदृष्टीने बघणाऱ्या स्वकीयांना कठोर शिक्षा देणारे छत्रपती शिवरायांवर जिजाऊंचे आदर्श संस्कार होते. स्वराज्यातील जनतेला सोन्याचे दिवस देऊन शेतकरी समृद्ध तर सैनिक हा स्वावलंबी बनवून आदर्श राज्यव्यवस्था निर्माण केवळ आदर्श संस्कारच करू शकतात. आणि ते संस्कार घालून रयतेला खऱ्या अर्थाने आईची माया लाऊन लेकरा प्रमाणे जपणाऱ्या जिजाऊ श्रेष्ठच आहेत. अठरा पगड जातीच्या लोकांना एकत्र करून स्वराज्याची उभारणी करणे एवढे सोपे नव्हते. प्रत्येक गोष्टीमध्ये विषमता असताना समतावादी स्वराज्याची संकल्पना डोक्यात येणे म्हणजे हिच मोठी क्रांती होती. जिजाऊंचे विचार व शिकवण ही जाती धर्मांपुरती मर्यादित नव्हती. जाती धर्मासाठी काम करणारे लोक मर्यादित होत असतात परंतु जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज हे राजे जरी असले तरीही त्यांना जनमाणसात प्रचंड सन्मान आहे. याचे कारण त्यांचे राज्य केवळ सत्तेसाठी किंवा शोषणासाठी नव्हते. तर समतेसाठी होते. म्हणून माँ जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांचा सन्मान करणारा, वंदन करून प्रेरणा घेणारा बहुसंख्य वर्ग हा वेगवेगळ्या जातीधर्माचा आहे. जिजाऊ जयंती निमित्ताने केवळ जिजाऊंच्या प्रतिमेला हार घालुन फायदा होणार नाही. तर जिजाऊंच्या संकल्पनेतील स्वराज्य आज उभे आहे का हे बघणे आवश्यक आहे. आणि जर जिजाऊंच्या संकल्पनेतील स्वराज्य नसेल तर स्वराज्याचे शत्रु कोण हे ओळखता आले पाहिजे तरच आपण मावळे असल्याचे सिद्ध होईल. स्वराज्यामध्ये शेतकरी सधन होता, शेतकऱ्यांना राजाश्रय होता, विषमतेला धारा नव्हता, स्त्री सुरक्षित होती, स्त्रियांचा सन्मान होता, गुन्हेगाराची जात धर्म न बघता शिक्षा केली जात होती. समान अपराधा साठी समान शिक्षा होती. परंतु आज आपण परिस्थिती बघितली तर पुर्ण पणे उलट आहे. देशात शेतकरी सुखी नाही, महिला सुरक्षित नाहीत, अपराधी लोकांनी पक्षांतर केले तर शिक्षा होत नाही, पक्षातील लोकांना शिक्षेतुन सुट तर विरोधी पक्षातील लोकांच्या मागे वेगवेगळ्या संस्था लाऊन लक्ष केले जाते. लोकशाही असुनही सत्य बोलता येत नाही, अन्याय अत्याचारा विरोधात आवाज उठवला तर पिडीत व्यक्तीलाच वेगवेगळ्या संकटांना सामोरे जावे लागते. सर्वसामान्य व सत्यवान लोकांना न्यायाची अपेक्षा राहली नाही. जाती धर्माच्या नावावर वादंग निर्माण करून राजकीय पोळी भाजून जनतेचे शोषण सुरू आहे. देशात समस्येचे थैमान असताना इतिहासाचे आजही विकृतीकरण करून चुकिचा इतिहास सांगितला जात आहे. थोडक्यात जिजाऊंच्या संस्काराच्या विरोधात येथे व्यवस्था निर्माण केली गेली आहे. ज्या आईने आभाळासारखी माया लाऊन लेकरा सारखे प्रेम करून स्वराज्य उभे केले. याच स्वराज्यात लोक सुखी व आनंदी होते परंतु आजच्या शासन काळत लोक दुःखी व समस्या ग्रस्त आहेत. याचे कारण शोधून जिजाऊंच्या स्वप्नातील लोकहीताची व्यवस्था निर्माण करण्यासाठी लोकशाही जगवणे आवश्यक आहे. व लोकशाही जगवायची असेल तर इव्हिएम ला विरोध करून सत्तेत जातीचे, धर्माचे नाही तर विचाराचे आणि कर्माचे लोक बसवणे आवश्यक आहे. देशात समता बंधुता न्याय प्रस्तावित होऊन जनता सुखी व समृद्ध झाली तरच जिजाऊ च्या विचारातील व्यवस्था तयार होईल. म्हणून रयतेला माया लावणाऱ्या राजमाता जिजाऊ यांना वंदन करताना, जयंती उत्सव साजरा करताना आपल्याला स्वराजाचे शत्रू ओळखुन ठेचता आले पाहिजे, माणसिक गुलामी बाजूला सारून डोळस व विज्ञानवादी बनले पाहिजे. मॉ जिजाऊ यांना वंदन करून स्वराज्याची भावना समाजात रुजवायची असेल तर अगोदर व्यवस्था समजून घेऊन व्यवस्थेवर वार करून मानवता जपता आली पाहिजे तरच जिजाऊंना वंदन केल्याचा अभिमान निर्माण होईल. जिजाऊ जयंती च्या मंगलमय सदिच्छा..

*****************

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

# महाप्रजापती गौतमी बुद्ध विहारात हरदास एल. एन. यांच्या जयंती निमित्त वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी : – समाज जीवनात कार्यरत बुद्ध, फुले, शाहू, पेरियार, आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी चळवळीतील जय भीम चे महत्व समजून घेताना जय भीम ची सुरूवात कधी झाली? कुणी केली? का केली? कशी केली? इत्यादी मुद्यावर विचारमंथन व्हावे जेणेकरून सामान्य जणांचे प्रबोधन करण्यासाठी महाप्रजापती गौतमी बुद्ध विहार समिती आणि फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या संयुक्त विद्यमाने जय भीम चे जनक हरदास एल. एन. यांच्या जयंती निमित्त अविष्कार कालनी, एन–६, सिडको, छत्रपती संभाजी नगर, (औरंगाबाद), महाराष्ट्र येथे ७ जानेवारी २०२४ ला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते धनराज गोंडाणे यांनी केले. ते म्हणाले की, हरदास लक्ष्मणराव नगराळे यांचा जन्म नागपूर जिल्ह्यातील शिंगोरी बोरी येथे झाला आहे. त्यांनी स्वामी ब्रम्हानंद यांचेकडून संस्कृत शिकून प्राविण्य मिळविले होते. १९२७ ला कामठी येथे रात्रशाळा चालविली होती. त्यांचेवर संत चोखामेळा यांच्या विचारांचा पगडा होता. १९२० साली साहूबाई शी त्यांचा विवाह झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच अस्पृश्यांचे नेते आहेत. हे स्पष्ट करण्यासाठी इंग्लंड चे प्रधानमंत्री रॅम्सेमॅक्डोनाल्ड यांना ३२ तारा पाठविल्या ज्यामुळे बाबासाहेब अस्पृश्यांचे नेते सिद्ध होऊ शकले. ते आल इंडिया डिप्रेस्ड असोसिएशनचे सचिव आणि अध्यक्ष होते. १९३७ ला ते विधानसभेवर निवडून आले होते.

या प्रसंगी सुधाकर मेश्राम असे म्हणाले की, हरदास एल. एन. यांना अस्पृश्यतेच्या कारणास्तव गिरणी चालकाने दळण दळून दिले नाही. परिणामी वसाहतीतील विविध महिलांनी महत्प्रयासाने दळण दळून दिले याचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला. त्यांनी ६ जानेवारी १९३५ ला जय भीम चा नारा दिला आहे. आशाताई आंभोरे म्हणाल्या की, तथागत बुद्ध आणि बाबासाहेब आंबेडकरांच्या त्याग बलिदानामुळे आपण येथे एकत्रित येऊन चर्चा करीत आहोत. सुधीर प्रभाकर खोब्रागडे म्हणाले की, पूर्वी वडील विहारात यायचे आता त्यांनी वडिलांचा वारसा पुढे चालवायचा ठरविले आहे. बी. टी. बागूल म्हणाले की, चळवळीसाठी तरुणांनी पुढे आले पाहिजे. त्यांचा हातभार लागणे अतिशय महत्त्वाचे आहे. आपण कुठल्याही क्षेत्रात कार्यरत असलो तरी चळवळीत सक्रिय राहिलेच पाहिजे. आपण बुद्धिष्ट असल्याने समाजात आपण आपली वेगळी ओळख निर्माण केली पाहिजे. पहिल्या गोलमेज परिषदेला गांधीं गेलेच नाहीत मात्र दुसऱ्या गोलमेज परिषदेला गेल्यावर अस्पृश्यांचे खरे नेते असल्याचा दावा केला परिणामी हरदास एल. एन. यांनी रॅम्से मॅकडोनाल्ड यांना ३२ तारा पाठवाव्या लागल्या म्हणून बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्यांचे नेते सिद्ध झाले.

प्रमुख वक्ते डॉ. रमेशचंद्र धनेगांवकर म्हणाले की, हरदास एल. एन. हे डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतील उजवा हात होता. त्यांनी जातीभेद नष्ट करण्यासाठी आंतरजातीय सहभोजनाचे आयोजन केले होते. सायमन कमिशनच्या वेळेस त्यांनी आपली साक्ष दिली. सी पी बेरार प्रांतातून ते निवडून आले होते. नागपूर परिषदेचे ते स्वागताध्यक्ष होते. पुणे करारांवर सही करणारी ही एक महत्त्वाची व्यक्ती होती. त्यांच्या अंत्यसंस्काराला अलोट गर्दी होती. त्यांच्या स्वाभिमानी विचारांना आचरणात आणण्याची आवश्यकता आहे.




कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे कट्टर अनुयायी असलेल्या बाबू हरदास यांना जय भीम चे जनक असे मानले जाते कारण त्यांनी या अभिवादनाचा सर्व प्रथम प्रयोग केला आहे. बाबू हरदास कार्यकर्त्यासोबत समाज जीवनात चळवळीच्या कार्या निमित्ताने भटकंती करीत असताना त्यांना वाटेत एका मुस्लिम व्यक्तींने त्यांच्या मित्राला सलाम वालेकुम तर समोरील व्यक्तींने वालेकुम सलाम असे म्हणताना ऐकले तेव्हा त्यांनी त्या दोन्ही व्यक्ती कडून त्याचा भावार्थ समजून घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा कळले की, अल्लाह आपको सलामत रखे। असे कळले त्यामुळे त्यांना असे वाटले की, आपलीही अशी स्वतंत्र ओळख असावी ज्यातून त्यांना जय भीम हे अभिवादन ६ जानेवारी १९३५ ला सुचले तेव्हा त्यांनी ही बाब सर्व प्रथम सोबत असणारे गौरीशंकर गजबे यांना सांगितली व यांचा प्रचार प्रसार करण्याची जबाबदारी गौरीशंकर गजबे आणि हरी चांदोरकर यांचेवर सोपविली. याची नोंद रामचंद्र क्षीरसागर लिखित 'दलित मुव्हमेंट इन इंडिया अँड इटस लीडर्स : (१८५७ ते १९५६)' पुस्तकात आहे. तेव्हा प्रथमत: उच्चारण करणा–यांनी जय भीम म्हणायचे तर ऐकणा–यांनी प्रत्युत्तरादाखल बल भीम म्हणायचे ठरले होते. तसे बरेच काळ चालले सुद्धा मात्र कालांतराने ऐकणा–या व ऐकविणा–या व्यक्तींने जय भीम म्हणण्याची प्रथा रूढ झाली. ती आजतागायत सुरू आहे. पुढे ३० डिसेंबर १९३८ ला मक्रणपूर येथे संपन्न झालेल्या दलित परिषदेत भाऊसाहेब मोरे यांनी सुद्धा हा नारा पुढे चालविण्याचा संदेश दिला. जय भीम चा अर्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो असा होतो. हरदास एल. एन. यांनी वयाच्या १७ व्या वर्षी 'महारठ्ठा' नावाने चळवळीचे साप्ताहिक सुरू केले होते. याची नोंद वसंत मून लिखित 'वस्ती' या पुस्तकात असून या पुस्तकाचे गेल आमवेट यांनी 'ग्रोईंग अप अनटचेबल्स' असे इंग्रजीत भाषांतर केले आहे. एखादा धुमकेतू आकाशात तळपावा अन् त्याच्या लख्ख प्रकाशाने डोळे दिपून जावे पण क्षणार्धातच तो नाहिसा व्हावा अस हरदास च्या बाबतीत आम्हाला झाल. अशी भावना वसंत मून यांनी व्यक्त केली आहे. द्वितीय गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे नेते कोण? अशी समस्या निर्माण झाली तेव्हा बाबू हरदास यांनी ब्रिटिश प्रधानमंत्री रॅम्से मॅकडोनाल्ड यांना ३२ तारा पाठवून ३२ वेळा पत्र व्यवहार केला. ज्यामुळे बाबासाहेब अस्पृश्यांचे नेते सिद्ध झाले. त्यांनी १९२४ ला 'मंडल महात्मे' हा ग्रंथ लिहिला तर 'वीर बालक' नावांचे नाटक ही लिहिले. १९२५ ला त्यांनी बीडी कामगारांची संघटना स्थापन केली. १९२७ मध्ये त्यांनी अस्पृश्य समाजातील मुलामुलींसाठी चालविलेल्या रात्रपाळिच्या शाळेतून ८६ मुले तर २२ मुली शिकून बाहेर पडल्या. १९३० ला बीडी मजूर संघ स्थापन केला. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या सचिवपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. बाबू हरदास यांच्या जीवनावर बोले इंडिया जय भीम असा चित्रपट आलेला आहे ते आपण समजून घेतले पाहिजे. त्यामुळेच सूर्याला जयभीम चित्रपट काढता आला तर ख्यातनाम गायिका गिन्नी माही यांना 'जय भीम–जय भीम, बोलो जय भीम' हे गीत गाता आले. अशा प्रकारे जय भीम ही आपल्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक क्रांतीच्या संघर्षाची ओळख ठरली असून कोट्यवधी जनतेच्या मुखातून दररोजच्या जीवनात जय भीम चा उद्घोष होत आहे. म्हणून आपल्या साठी जय भीम, जय भीम आणि जय भीमच अंतिम सत्य आहे. याचा प्रचार प्रसार करणे हीच हरदास एल. एन. यांना खरी आदरांजली ठरेल.

कार्यशाळेचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन विठ्ठल पवार तर एम. जी. गाढे यांनी आभार व्यक्त केले. व्ही. आर. पवार, धनराज गोंडाने, डॉ. रमेशचंद्र धनेगांवकर, सुधाकर मेश्राम, सुधीर प्रभाकर खोब्रागडे, एम. जी. गाढे, आशा अंभोरे, निर्मला देविदास मगरे, रंजना गायकवाड, सुमन गाढे, सरस्वती धाबर्डे, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षो ल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

# खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नाने कल्याण यार्ड रीमॉडेलिंग प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल होणार सादर

उल्हासनगर / प्रतिनिधी : कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने कल्याण यार्ड रीमॉडेलिंग प्रकल्प राबविण्यात येत आहे. सुमारे ८०० कोटी रुपयांच्या निधीतून या प्रकल्पाची उभारणी करण्यात येत आहे. या प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी मुंबई येथील मध्य रेल्वेच्या कार्यालयात विभागीय रेल्वे व्यवस्थापक रजनीश कुमार गोयल आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक बैठक पार पडली. या बैठकी दरम्यान कल्याण यार्ड रीमॉडेलिंग प्रकल्पाचा आराखडा येत्या काही दिवसात तयार होणार असून त्यानुसार काम सुरू करण्यात येणार असल्याचे रेल्वे प्रशासनातर्फे सांगण्यात आले. तसेच कळवा ते अंबरनाथ स्थानकांमध्ये स्वच्छ शौचालय, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शेड यांसारख्या सुविधा उभारण्यात याव्या अशा सूचना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना दिल्या आहेत . कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने मतदारसंघातील विविध शहरांमध्ये अनेक विकास प्रकल्प मार्गी लागत आहेत. मतदारसंघातील विविध रेल्वे स्थानकांमध्ये सरकते जिने, लिफ्ट, शेड, होम प्लॅटफॉर्म, स्थानकात बसण्यासाठी आसन यांसारखी विविध कामे खासदार डॉ. शिंदे यांच्या पुढाकाराने मार्गी लागली आहेत . याच पार्श्वभूमीवर रेल्वे स्थानकांचा विकास व्हावा तसेच रेल्वेशी निगडित असलेले अनेक प्रकल्प मार्गी लागावे यासाठी मुंबई येथील मध्य रेल्वेच्या कार्यालयात विभागीय रेल्वे व्यवस्थापक रजनीश गोयल आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक पार पडली. यावेळी विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली असुन खासदार डॉ. शिंदे यांच्या पुढाकाराने आणि संकल्पनेतून कल्याण यार्ड मॉडेलिंग प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाअंतर्गत करण्यात येत असलेल्या कामांचा आढावा घेऊन ही कामे जलद गतीने करण्यात यावीत, अशा सूचना खासदारांनी दिल्या आहेत . या प्रकल्पांतर्गत कल्याण रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास करण्यात येणार आहे. तसेच रुळांचे विभाजन करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत कल्याण पूर्व स्थानक परिसरात थेट कोणतीही वाहने जाऊ शकत नाहीत. नागरिकांना काही मीटर अंतर चालत येऊन स्थानक गाठावे लागते. यामुळे वाहनांना स्थानकात येण्यासाठी कोणते मार्ग उपलब्ध करून देण्यात येतील याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

या पर्यायी मार्गांचा आणि प्रकल्पाचा येत्या काही दिवसात सविस्तर आराखडा तयार केला जाणार असल्याचे यावेळी रेल्वे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. या प्रकल्पाच्या पूर्णत्वानंतर नागरिकांना रेल्वे स्थानक परिसरात थेट वाहने घेऊन जाता येणार आहे. याबरोबरच सकाळच्या वेळी डोंबिवली तसेच अंबरनाथ, बदलापूरहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असते. या वेळेत या मार्गावर एसी लोकलची मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे. प्रवाशांच्या याच मागणीनुसार या सकाळी ८ ते ८.३० च्या दरम्यान या मार्गावरून एसी लोकल सुरु करण्यात यावी अशी सूचना यावेळी रेल्वे प्रशासनाकडे करण्यात आल्या. तर ठाणे पुढील सर्व रेल्वे स्थानकातील शौचालयांची दुरवस्था थांबविण्यासाठी पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप या तत्त्वावर ते चालविण्यासाठी देण्यात आले तर त्याची चांगल्या पद्धतीने देखभाल ठेवण्यात येईल. यामुळे नागरिकांना प्रामुख्याने महिलांना स्वच्छ शौचालये उपलब्ध होतील असे मत यावेळी खासदार डॉ. शिंदे यांनी व्यक्त केले. तर अमृत भारत स्टेशन योजनेद्वारे दिवा, मुंब्रा, डोंबिवली या स्थानकांचा विकास केला जाणार आहे. उर्वरित स्थानकांचेही नूतनीकरण करण्यात येणार असल्याचे यावेळी रेल्वे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. या बरोबरच अंबरनाथ रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडील मुख्य प्रवेशद्वार आणि स्थानक परिसराला ’ हेरिटेज लूक ’ देण्यात यावा. यासाठी नियोजन करण्याच्या सूचना डॉ.शिंदे यांनी दिल्या. रेल्वे प्रशासनाकडून याबाबत नियोजन करण्यात आले असून याचे काम लवकरच सुरु करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या विविध प्रश्नांसह पावसाळ्यात रेल्वे रुळांवर पाणी साचू नये यासाठी रेल्वे प्रशासन आणि स्थानिक महापालिका यांच्या समन्वयाने नालेसफाई पूर्णत्वास न्यावी. कल्याण लोकसभा मतदार संघातील सर्व स्थानकांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था रेतीबंदर आणि गणेशपाडा येथे भुयारी मार्ग, दिवा आणि वसई दरम्यान रेल्वे गाड्यांची संख्या वाढविण्यासाठी नियोजन करण्यात यावे अशा सूचना यावेळी खासदार डॉ. शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. विभागीय रेल्वे व्यवस्थापक रजनीश गोयल यांनीही सर्व विकासकामे वेगाने केली जातील, याची ग्वाही देत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या विविध सूचनांना सकारात्मक प्रतिसाद दिला. या बैठकीला आमदार डॉ. बालाजी किणीकर, उल्हासनगर महानगरप्रमुख राजेंद्र चौधरी, उल्हासनगर उपजिल्हा प्रमुख अरुण आशान, माजी नगरसेवक सुभाष साळुंके, दिवा उपशहरप्रमुख आदेश भगत, उपशहरप्रमुख प्रशांत काळे, डोंबिवली शहर सचिव आणि विधानसभा क्षेत्र प्रमुख संतोष चव्हाण, माजी नगरसेवक निलेश शिंदे, स्वाती मोहिते यांच्यासह शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी आणि मध्य रेल्वेचे अधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रीय महामार्ग१६१धुळीचे साम्राज्य ; जिकडे तिकडे धुळच धूळ

किनवट ता.प्र. / शेख शौकत :– किनवट शहरातील धूळ बघून या शहराला काही शासन, प्रशासन, पर्यावरण प्रदूषण महामंडळ कोणी वाली आहे की नाही असा प्रश्न नागरिकांना पडत आहे. किनवट गोकुंदा नागरी वस्ती मधून जात असलेल्या महामार्ग क्रमांक १६१ अ चे काम अनेक वर्षापासून एक दोन एक दोन किलोमीटर मध्ये पुलाच्या ठिकाणी गॅप ठेवत अत्यंत संथ गतीने चालू होते. त्यातच किनवट शहरातील रोडचे काम अद्याप चालू केले नाही आणि डागडूझी होत नसल्याने सदर रोडवर नेहमीच धुळीचे साम्राज्य असते परिणामी नागरिकाच्या आरोग्यावर त्याचा दुरगामी परिणाम होत आहे. महाराष्ट्र राज्य पर्यावरण महामंडळाने मात्र या बाबीकडे साफ दुर्लक्ष केलेले आहे.

ज्या नागरिकांना धुळीची अलर्जी आहे अशा नागरिकांना आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे यात धूलिकण फुफ्फुसात जमा होतात. ॲलर्जीचा त्रास असणा–यांना सर्दी, खोकला, कफ होणे, धाप लागणे असे त्रास होतात, तर सर्वसामान्यांना सर्दी, खोकला आणि घशात दुखणे असे त्रास होत आहेत. या धूलिकणांचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे श्वसनाची क्षमता कमी होणे, ब्राँकॉयटिस होणे असे अनेक आजार होण्याची शक्यता आहे. तर व्यवसायीकांच्या दुकानात कीलोने धूळ जमा होत आहे. किनवट शहरातून जाणारा



राष्ट्रीय महामार्गाचे सहा ते सात वर्षापासून काम चालू असून किनवट शहरातील रोडची दुरुस्ती न केल्याने व शहरातील अंतर्गत रस्त्यांवरील खड्डे, ड्रेनेजसाठी केलेली खोदाई व पावसाचे पाणी वाहून जाऊन रस्त्यावर आलेली माती यामुळे उडणारी धूळ या सह इतर कामे सुरू झाल्यानंतर धुळीत आणखी भर पडत आहे. काही ठिकाणी पाणी युटिलिटीसाठी व पाणीपुरवठा साठी टाकण्यात येणाऱ्या पाइपसाठीच्या खोदाईमुळे, मोठ्या प्रमाणावर धूळ उडत आहे. या रस्त्यांवर वाहन काही मिनिटे जरी थांबवले तर त्यावर धुळीचा थर साचत आहे. श्वसनातून किती प्रमाणात धूळ जाऊ शकते याचा अंदाज न केलेला बरा. नगरपालिका प्रशासनाच्या ब्रीदवाक्यानुसार किनवट शहर स्वच्छ शहर ओळख गत चार–पाच वर्षापासून लोप पावत असून धूळयुक्त शहर अशी नविन ओळख आता किनवट शहराने निर्माण केली आहे. ही ओळख पुसून काढण्यासाठी न.प. प्रशासनालाच पुढाकार घेण्याची गरज निर्माण झाली आहे. पर्यावरण प्रदूषण महामंडळ यांच्या वायु प्रदूषण गाईडलाईन नुसार कॉन्ट्रॅक्टर करारनाम्याची पायमल्ली करत असून स्थानिक प्रशासन याकडे कानाडोळा करता आहे. स्वच्छ शहर सुंदर शहर, कचरा मुक्त शहर, असे भिंती फलक रंगऊन संदेश देणारे इतरत्र अतोनात खर्च करणारी न.प. प्रशासनाला हे का दिसत नसावे असा सवाल किनवटकरानी करुन किनवट शहराला धूळ मुक्त करण्याची मागणी आहे.‘‘गत अनेक वर्षापासून नागरिक धूळीचा त्रास सहन करीत आहे. चालू असलेली सर्व विकासकामे होतील तो पर्यंत संबंधित प्रशासनाने रोडवर टँकरद्वारे पाणी टाकून तात्पुरती का होईना किनवट करांना धुळीपासून मुक्तता द्यावी अशी मागणी सामान्य नागरिकाकडून होत आहे.

# जन्मताच बेवारस टाकलेल्या बाळाला मध्यवर्ती रुग्णालयाचा सहारा



उल्हासनगर : उल्हासनगर कँप ४ येथील सुभाष टेकडी परिसरात असलेल्या आम्रपाली नगर येथे एका वैरीण मातेने आपल्या नुकत्याच जन्मलेल्या बाळाला सार्वजनिक शौचालयात टाकुन पळ काढला परंतु एक महिला त्या शौचालयात गेली असता तिला लहान बाळाच्या रडण्याचा आवाज आला. तिने बाळ रडत असलेल्या ठिकाणी गेली तेव्हा तिला धक्काच बसला. मात्र त्या महिलेने क्षणाचा ही विलंब न लावता त्या बाळाला उचलुन ताबडतोब मध्यवर्ती रुग्णालयात नेवुन दाखल केले. डॉक्टरानी सुध्दा त्या बाळावर वेळीच उपचार केल्याने त्या बाळाचा जीव वाचला आहे.या प्रकरणी विठ्ठलवाडी पोलिस ठाण्यात अज्ञात महिलेच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला असुन पोलिस त्या मातेचा शोध घेत आहेत.

उल्हासनगर कँप ४ येथील आम्रपाली नगर मध्ये काल पहाटेच्या वेळी सार्वजनिक शौचालयात एक बाळ रडत असल्याचा आवाज शौचालयात गेलेल्या महिलेला आला . तेव्हा बाळाला शौचालयाच्या भांड्यात टाकलेले दिसुन आले. तर त्या बाळाला उचलुन ताबडतोब मध्यवर्ती रुग्णालयात नेले असता डॉक्टरानी शर्थीचे प्रयत्न करुन त्या बाळाचा जीव वाचवला . रुग्णालयातील एस एन सी यु विभागात उपचारासाठी दाखल असलेल्या बाळाला पाहण्यासाठी महिला व बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा राणी बैसाणे व सदस्या ड मनिषा झेंडे यांनी जावुन बाळाची चौकशी केली. तर त्या बाळाला लवकरच रुग्णालयातुन सुट्टी मिळाल्यावर त्या बाळाची देखभाल महिला व बाल कल्याण विभागा मार्फत घेण्यात येणार असल्याची प्रतिक्रिया राणी बैसाणे यांनी दिली आहे. सदर बाळ हे आम्रपाली नगर मध्ये आढळुन आल्याने व स्त्री जातीचे असल्याने त्या बाळाचे नाव रुग्णालयातील डॉक्टर व परिचारिका यांनी आम्रपाली असे ठेवले आहे.

# उल्हासनगर महापालिकेच्या मुकादमला दोन हजार रुपयाची लाच घेताना अटक

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर महापालिकेच्या संजय पेडामकर या मुकादमाला एका शोरमा विक्री करणाऱ्या कडुन दोन हजार रुपयाची लाच घेताना लाच लुच प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यानी अटक केली आहे . उल्हासनगर मध्ये रोडवर हाथ गाड्या लावुन फेरी वाले धंदा करुन आपला उदरनिर्वाह करतात . त्यांच्या कडुन महापालिका दरदिवशी पावती देवुन पैसे वसुल करते. तर महापालिकेचे अधिकारी कर्मचारी हे सुध्दा या हाथ गाड्यावाल्याना नाहक त्रास देतात. दरम्यान उल्हासनगर कँप ५ येथे ५ शोरमा गाड्या चालु ठेवन्यासाठी ३ हजाराची मागणी मुकादम संजय पेडामकर याने करुन प्रथम ५०० रुपये घेतले. त्या नंतर उर्वरित २५०० रुपये लाच मांगितली , तेव्हा २००० रुपये देण्याचे नक्की करण्यात आले . दरम्यान त्या शोरमा विक्री करणाऱ्या गाडीवाल्याने या बाबत ची तक्रार ठाणे अंटीकरप्शन कडे केली, तेव्हा काल रात्री ८ वाजता कँप ५ येथे अंटीकरप्शन च्या अधिकाऱ्यानी सापळा लावला असता मुकादम संजय पेडामकर याला २००० रुपयाची लाच घेताना रंगे हाथ पकडले आहे. या प्रकरणी हिल लाईन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन पुढील तपास पोलिस करत आहेत.

# के बी रोड च्या नाल्यावर टोलेजंग इमारतीचे बांधकाम मोठा नाला केला छोटा, महापालिकेचे दुर्लक्ष

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर – ३ येथील राधास्वामी संत्संग जवळ असलेल्या के बी रोडवर एका बिल्डर ने मोठा नाला हडप करुन त्या ठिकाणी भव्य असे टोलेजंग इमारतीचे बांधकाम केले असुन या बिल्डर ने मोठा नाला हडप करुन त्यावर आर सी सी चे बांधकाम केल्याने नाला लहान झाला आहे. येणाऱ्या पावसाळ्यात सदर नाल्याचे पाणी शेजारी असलेल्या नागरिकांच्या घरात जावुन नुकसान होण्याची शक्यता असुन महापालिकेने या बिल्डरला पुर्णपणे सुट दिली आहे.

उल्हासनगर कँप ३ येथील के बी रोडवर राधास्वामी सत्संग जवळ असलेल्या जागेवर हिलट्रॉन नावाने २४ माळ्याची इमारत उभी झाली असुन या बिल्डर ने रोड लगत चा मोठा नाला हडप करुन त्या नाल्यावर आर सी सी चे बांधकाम केले आहे. नाला तोडल्याने नाल्यातील पाणी रोडवर येत आहे. तर या बिल्डर ने समोरच असलेले १२ झाडे तोडुन टाकली असुन



उरलेली तीन चार झाडे हे सुध्दा तोडण्याच्या तयारीत असल्याचे दिसुन येते. सदर इमारतीच्या २४ माळ्याचे बांधकाम पुर्णत्वा कडे आले असुन नाला लहान झाल्याने नाल्यातील घाण पाणी रोडवर येत असल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे.या इमारतीच्या बांधकामावर उल्हासनगर महापालिकेचे आयुक्त व प्रभाग अधिकार यांचे मात्र दुर्लक्ष होत असल्यानेच या बिल्डर ने या नाल्यावर बांधकाम केले आहे. कल्याण अंबरनाथ रोडवर या बांधकामामुळे वाहतूक कोडी होत असल्याने वाहन चालकाना मात्र मोठीं कसरत करावी लागत आहे.दरम्यान या बिल्डर ने नाला हडप केल्यामुळ्या त्या इमारतीवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिक करत आहेत.

# सावित्रीबाई फुले यांची १९३ वी जयंती कल्याण येथे उत्साहात साजरी.




कल्याण /प्रतिनिधि : – श्री.सावता माळी मंडळ कल्याण यांच्या वतीने सावित्रीबाईं फुले यांची १९३ वी जयंती कल्याण (प) भोईरवाडी येथे उत्साहात साजरी करण्यांत आली.सावित्रीबाईं फुले यांच्या प्रतिमेस नवनिर्वाचित अध्यक्ष श्रीमती मंदाताई ताम्हाणे महिला मंडळ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व शसावता माळी मंडळ अध्यक्ष अनिल (अण्णा) यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरवात करण्यात आली.या प्रसंगी महिला मंडळच्या माजी अध्यक्ष.सौ प्रभावती डोंगरे यांनी सावित्रीबाईं फुले यांचा जीवनपट व कार्य सांगितले.आज ही सावित्रीबाईं फुले यांच्या कार्य कतृत्व हे समाजाला दिशा देणारे आहे. हया कार्याची ज्योत आपल्या सारख्या महिलांनी सतत तेवत ठेवून सामाजिक कार्यात कार्यरत राहून पुढील पिढीस मार्गदर्शन केले पाहिजे,माजी अध्यक्ष. सौ प्रभावती डोंगरे यांनी असे सांगितले. यावेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते मुक्त पत्रकार श्री.सुदाम गाडेकर यांनी आपले विचार मांडताना सांगितले की या कार्यक्रमाच्या माध्यमातून सावित्रीबाईं फुले यांच्या विचारांचा प्रचार प्रसार आपण सर्वांनी केला पाहिजे,त्यांचा त्याग विसता कामा नये महिलांच्या प्रगतीसह सन्मानासाठी या माऊलीने सनातनी वर्गाचा छळ सहन केला म्हणूनच आम्ही ताठ मानेने सांगतो माझी मुलगी सून बहिण इंजिनीअर डॉक्टर वकील मॅनेजर आहे. पुरुषांच्या बरोबरीने महिलांना जो सन्मान मिळतो तो सावित्रीबाई फुले यांच्या मुळेच मिळतो याची जाणीव महिलानी ठेवावी असे सुदाम गाडेकर म्हणाले.या प्रसंगी विदया चौधरी सुरेखा बटवाल,शोभा थोरात,वर्षा गिते,आशा थोरात,नलिनी अडसूळ,रविंद्र चौधरी,धनंजय गायकवाड,विक्रम बटवाल,महाजन सर,नवनित गायकवाड,भूषण मेहेर इ मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रस्ताविक सदाशिव डोंगरे यांनी केले आभार मच्छिंद्र डोके यानी मानले.

# सिद्धार्थ तायडे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित..!

मलकापूर : येथे दिनांक ११ जानेवारी रोजी समाजरत्न दयाभाई खराटे यांच्या १५ व्या स्मृतिदिनानिमित्त भव्य अभिवादन सभेचे जनता कॉलेज मध्ये आयोजन करण्यात आले होते. दया भाई खराटे हे डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा नामांतर लढ्यातील एक सक्रिय लढाऊ योद्धे होते. त्यांनी भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून बाबासाहेबांची चळवळ संपूर्ण जिल्हाभर पोहोचवली. त्यांच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी त्यांचे आज्ञाधारक पुत्र तथा निमंत्रक अतिश भाई खराटे हे दया भाई खराटे फाउंडेशन च्या वतीने दरवर्षी समाजातील आंबेडकरी चळवळीतील सामाजिक, कार्यकर्ते, कलावंत, पत्रकार, साहित्यक ,शाहीर इत्यादी लोकांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येते. त्याप्रमाणे वडनेर भोलजी येथील युवा सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार यांना त्यांच्या पत्रकारितेतील कार्याबद्दल उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. गेल्या वर्षी पद्मपाणी प्रतिष्ठान ,बीडच्या वतीने सुद्धा पद्मपाणि राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार सिद्धार्थ तायडे यांना मिळाला होता. तर यावर्षी सुद्धा त्यांना ७ जानेवारी रोजी मिरज जिल्हा सांगली येथे भांगीरथी राज्यस्तरीय निर्भिड पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला जिल्हाभरातून कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष डॉ.वले सर हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मलकापूर ठाणेदार संदीप




काळे साहेब, जिल्हा नेते प्रशांत भाऊ वाघोदे, वंचित बहुजन आघाडी महिला बुलढाणा जिल्हा अध्यक्ष विशाखा ताई सांवग, भाऊराव उमाळे, प्रीतीताई शेगोकार, सुशील मोरे, विलास तायडे, शाहीर डी आर इंगळे, आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाची बहाद्दर सूत्रसंचालन नितीन सूर्यवंशी यांनी पार पाडले. सिद्धार्थ तायडे यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरातून व मित्रमंडळी कडून अभिनंदन होत आहे. तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दया भाई खराटे फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE